॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

* सुविचार *
कडू घोट प्रेमळ माणसाच्या
हातून घेतला तर तो गोड लागतो.




■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. २० एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ११ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### राज्यभरात उष्णतेची लाट; पारा ४४ पार

● **पुणे** – राज्यात वाढलेल्या तापमानामुळे जणूकाही सूर्य आग ओकत असल्याचा अनुभव येत आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून उष्णतेची लाट पसरली आहे. यातच मागील दोन दिवसांपासून अकोला महाराष्ट्रातील सर्वाधिक उष्ण शहर बनले आहे. कारण अकोल्यातील तापमान हे ४४.१ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. राज्यात झालेल्या अवकाळी पावसानंतर सर्वत्र तापमान वाढले असून उष्णतेची लाट पसरली आहे. राज्यातील बहुतांश शहरातील तापमान हे ४० अंशाच्या पार गेल्याने उष्णतेची तीव्रता वाढली आहे. यातच अकोला शहरात सर्वाधिक तापमानाची नोंद झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. परवा अकोल्याचा पारा ४३.४ अंशावर होता. तर काल पुन्हा अकोल्याचा तापमानाचा पारा वाढून थेट तापमान ४४ अंशापार गेले आहे.

### नेहरूंकडून सत्य, धैर्याचा वारसा मिळाला : खा. गांधी

● **नवी दिल्ली** – दडपशाहीचा प्रतिकार करण्याचा आणि धैर्याने स्वातंत्र्य मिळविण्याचा जवाहरलाल नेहरू यांचा भारतीयांसाठी सर्वांत मोठा वारसा आहे. त्यांच्याकडून सत्य आणि धैर्य मला वारशाने मिळाले, असे प्रतिपादन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज केले. काँग्रेस नेते संदीप दीक्षित यांनी त्यांची मुलाखत घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यासंबंधीचा व्हीडीओ एक्सवर जारी केला आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी आम्हाला राजकारण शिकविले नाही. त्यांनी आम्हाला भीतीचा सामना करायला आणि सत्यासाठी उभे राहण्यास शिकविले, असेही राहुल गांधी म्हणाले. शोध घेणे, प्रश्न विचारणे, कुतूहल राहणे हे नेहरूंचे विचार आहेत. आपल्या कुटुंबाच्या आठवणीबद्दल बोलताना राहुल गांधी यांनी त्यांच्या आजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी नेहरूंच्या साहसांच्या आणि आनंदाच्या कथा सांगितल्या, याची आठवण त्यांनी करून दिली. जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल आणि सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांची आठवण राहुल गांधी यांनी केली. या सर्वांनी भीतीशी मैत्री कशी करावी, हे शिकविले, असे ते म्हणाले. बिल गेटस् आणि चेतराम मोचीसारख्या सामान्य माणसाशी समान भावनेने बोलतो. सर्वांना एकाच नजरेने पाहतो. खरे नेतृत्व म्हणजे नियंत्रण मिळविणे नसून, करुणेने राहणे असते. आजच्या भारतात, जिथे सत्य गैरसोयीचे झाले, मात्र, मी माझा मार्ग निवडला आहे. काहीही किंमत मोजावी लागली तरी मी सत्याच्या बाजूने उभा राहीन, असेही राहुल गांधी म्हणाले.

# ठाकरे बंधू एकत्र येणार?

## राज ठाकरेंची साद, उद्धव ठाकरेंचा त्वरित प्रतिसाद



● **मुंबई । वीरभूमी**–
राजकीय अस्तित्वाची लढाई लढत असलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मराठी माणसाच्या, महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही एकत्र येऊ शकतो, असे सांगत उद्धव ठाकरे यांना साद घातली तर महाराष्ट्रद्वेषी लोकांशी संबंध तोडण्याची राज यांची तयारी असेल तर आपणही तयार असल्याचे सांगत त्यांना प्रतिसाद दिल्याने महाराष्ट्राचे राजकारण आज अचानक ढवळून निघाले. महाराष्ट्र, मराठी माणसाची अस्मिता यांच्या समोर आमच्यातील वाद-भांडणे क्षुल्लक आहेत. आम्ही एकत्र येणे फार कठीण आहे, असे वाटत नसल्याचे राज ठाकरे म्हणाले तर उद्धव ठाकरे यांनी, आमच्यात भांडणे कधीच नव्हती, जी होती ती मिटवून टाकली चला; पण भाजपासोबत जायचे की माझ्यासोबत हे एकदा ठरवा. महाराष्ट्र विरोधी लोकांसोबत संबंध ठेवणार नाही, अशी शपथ शिवरायांसमोर घ्या, अशी अट उद्धव ठाकरे यांनी घातली.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेली अनेक वर्षे ज्या संभाव्य राजकीय घडामोडीची सातत्याने चर्चा होत असते ती प्रत्यक्षात येण्याचे धूसर संकेत दिसायला लागले आहेत. राजकीयदृष्ट्या अडचणीत असलेले ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खुद्द मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टाळीसाठी हात पुढे केला असून उद्धव ठाकरे यांनीदेखील त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच-सहा वर्षांत प्रचंड उलथापालथी झाल्या. आता महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा ठाकरे बंधू एकत्र येण्याचे ठोस संकेत दिसायला लागले आहेत. खुद्द राज ठाकरे यांनीच त्यासाठी पुढाकार घेतला. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या यू ट्युब चॅनलसाठी दिलेल्या मुलाखतीत राज ठाकरे यांनी नव्या राजकीय समीकरणाचे संकेत देऊन महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली.

महाराष्ट्र खूप मोठा आहे. महाराष्ट्र, मराठी माणसाच्या अस्तित्वासमोर आमच्यातील भांडणे, वाद हे अतिशय क्षुल्लक आहेत. आम्ही एकत्र येणे फार कठीण आहे, असे वाटत नाही. अर्थात हा माझ्या इच्छेचा किंवा स्वार्थाचा विषय नाही. उलट मी तर म्हणतो की, संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी लोकांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा. मी आयत्या पिठावर रेघोट्या मारणा-यांतील नाही. त्या वेळी मी उद्धवसोबतदेखील काम करू शकत होतो; पण समोरच्याची इच्छा आहे का मी सोबत काम करावे? हा प्रश्न आहे. यात मी कोणताही अहंकार मध्ये आणत नाही, असे राज ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्र-मराठीच्या हितासाठी किरकोळ भांडणे बाजूला ठेवून मी यायला तयार आहे. मुळात आमच्यात भांडणे नव्हतीच, असतील तर ती मिटवून टाकली चला; पण हेच मी लोकसभेच्या वेळेला सांगत होतो की, गुजरातला हे उद्योग घेऊन चालले आहेत. तेव्हाच विरोध केला असता तर हे सरकार न बसता महाराष्ट्राच्या हिताचे सरकार बसले असते. महाराष्ट्राच्या हितासाठी ही किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे; पण महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कोणी येईल, त्याला घरात बोलावयाचे नाही. मराठी माणसांनी आता ठरवावे की भाजपासोबत जायचे की माझ्यासोबत यायचे. महाराष्ट्राचे हित ही एकच शर्त आहे. या चोरांच्या गाठीभेटी घ्यायच्या नाहीत. कळत नकळत पाठिंबा द्यायचा नाही, अशी शिवरायांची शपथ घ्या मग टाळी देण्याची हाळी द्या, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

राज आणि उद्धव ठाकरे हे दोघे बंधू जर एकत्र येणार असतील तर आम्हाला आनंदच आहे. कोणी जर आपापसातील मतभेद विसरून एकत्र येत असतील तर वाईट वाटण्याचे कारणच नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मनसे अध्यक्ष म्हणून राज ठाकरे हे स्वत: काम करतात तसेच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे हे काम करतात. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दोन्ही पक्षाबाबत काय भूमिका घ्यावी हा प्रश्न त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. प्रत्येकाने सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून योग्य तो निर्णय घ्यावा, असे अजित पवार म्हणाले.

## १ मे पासून मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, 'समृद्धी'वर सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

● **मुंबई । वीरभूमी**–
मुंबईतील सर्व टोल नाक्यांवरून छोट्या वाहनांना टोलमुक्ती मिळाल्यानंतर आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरून धावणाऱ्या सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी मिळणार आहे.

१ मे २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून सरकारकडून 'महाराष्ट्र दिनाची' भेट ठरणार आहे. मात्र, या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवर १०० कोटींचा भार पडणार आहे.

देशभरात इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीने गती घेतली असली तरीही एकूण वाहन विक्रीपैकी फक्त ६-७ टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत. त्यामध्ये देखील दिल्ली (१२ टक्के), कर्नाटक (९-१० टक्के) आणि तामिळनाडू (८ टक्के) यासारख्या राज्यांनी प्रागतिक धोरणे व पायाभूत सुविधांच्या विकासाच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहनांच्या अधिक प्रमाणावरील स्वीकारार्हतेला चालना दिली आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात एकूण वाहन विक्री पैकी फक्त ५ ते ६ टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत.

महायुती सरकारने २०२५ पर्यंत प्रमुख शहरांमध्ये नवीन नोंदणीकृत वाहनांपैकी १० टक्के वाहने इलेक्ट्रिक असावीत, असे लक्ष्य ठेवून सुधारित 'ईव्ही' धोरण आणत आहे. राज्यात सद्य:स्थितीत १ जानेवारी २०२५ पर्यंत ४ कोटी ८८ लाख वाहने असून त्यापैकी ६ लाख ४४ हजार ७७९ वाहने ही इलेक्ट्रिकवर धावणारी आहेत.

'ईव्ही'चा वापर वाढविण्यासाठी महामार्गावर चारचाकी, बसेस व ट्रकसाठी उच्च दाबाच्या चार्जिंगची सुविधा असणारे स्टेशन दर २५ कि.मी. अंतरावर असणार आहे. दरम्यान, राज्यात उभारण्यात येणा-या एकूण चार्जिंग स्टेशनपैकी १० टक्के स्टेशन ही यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर उभारली जातील; तर उर्वरित स्टेशन राज्याच्या इतर भागात व राष्ट्रीय महामार्गावर प्राधान्याने उभारण्यात येणार आहेत.

## टँकरद्वारे पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र ॲप तयार करा

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । टंचाईग्रस्त भागात सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश

● **नगर । वीरभूमी**–
अहिल्यानगर ग्रामीण भागात टँकरद्वारे पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र ॲप तयार करावे. टँकर सुरू असलेल्या गावात पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक जाहीर करावे, जेणेकरून ग्रामस्थांना टँकरची वाट पाहावी लागणार नाही. तालुका पातळीवर पाणी पुरवठ्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पाणी टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीसाठी आमदार काशिनाथ दाते, अमोल खताळ, विठ्ठलराव लंघे, विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उप वनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांनी पाण्याच्या उद्भवात उपलब्ध पाणीसाठ्याची स्वतः खात्री करावी. पाण्याचा उद्भव गावापासून कमी अंतरावर राहील याची दक्षता घ्यावी. पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरच्या स्वच्छतेकडेही लक्ष द्यावे आणि पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासावेत. पाण्याचे नमुने तपासल्याशिवाय टँकर भरू नये. टँकर वेळेवर न आल्यास संपर्कासाठी व्यवस्था करण्यात यावी. जनतेला गरजेएवढे पाणी मिळावे हि शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री म्हणाले, जलसंपदा अधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय ठेऊन शेवटच्या टोकापर्यंत पाणी मिळेल याचे नियोजन करावे. पाणी उपलब्ध असताना ग्रामीण पाणी पुरवठा योजना बंद पडणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. नागरिकांसोबत पशुधनालाही पुरेसे पाणी उपलब्ध होईल असे नियोजन करावे. प्रत्येक पाणी पुरवठा योजनेचे शुद्धीकरण प्रकल्प सुरु राहतील याची दक्षता घ्यावी. तलाव परिसरातील विंधनविहिरी आणि विहिरी आवश्यकतेनुसार अधिग्रहित कराव्या. पाणी योजनेसाठी सौर ऊर्जेचा उपयोग करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या. श्री. विखे पाटील यांनी जिल्ह्यातील चारा उपलब्धतेची माहितीही यावेळी घेतली, तसेच अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतपिकाच्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी उपस्थित आमदार महोदयांनी उपयुक्त सूचना केल्या. ग्रामीण भागात पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले. निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांनी सादरीकरणाद्वारे टंचाई निवारणासाठी जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

# मुंबईतील मंदिर पाडल्याच्या विरोधात जैन समाजाचे आंदोलन

● **मुंबई । वीरभूमी** –
मुंबईतील विलेपार्ले भागात असलेले जुने पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर मुंबई महानगरपालिकेने दोन दिवसांपूर्वी पाडले होते. मुंबई पालिकेच्या या कारवाईनंतर देशभरातील जैन समुदाय संतप्त झाला आहे. मुंबई मनपाच्या कारवाईविरोधात जैन समाजाकडून शनिवारी अहिंसक रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने जैन समाजबांधव सहभागी झाले होते. त्यांच्या हातात 'मंदिर टूटा, हौसला नही', असे फलक होते. मंदिर पुन्हा बांधून देण्याची मागणी या लोकांनी केली. रॅलीत स्थानिक सर्वपक्षीय नेतेसुद्धा सहभागी झाले होते.

दरम्यान, शनिवारी सकाळी ९.३० वाजता जैन समाजाकडून आंदोलन सुरू झाले. आंदोलनापूर्वी जैन बांधवांनी तोडलेल्या मंदिरामध्ये आरती केली. त्यानंतर आंदोलनास सुरुवात झाली. 'मंदिर टूटा, हौसला नही,' असे फलक घेऊन जैन समाजबांधव रस्त्यावर उतरले. मंदिर त्याच ठिकाणी हवे, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली. आंदोलनात भाजप नेते आणि मंत्री मंगलप्रभात लोढा, काँग्रेस नेत्या आणि खासदार वर्षा गायकवाड, आमदार पराग अलवाणी यांच्यासह इतर स्थानिक नेते सहभागी झाले होते.

जैन समाजाच्या या आंदोलनात जैन समाजातील महिलासुद्धा मोठ्या संख्येने उतरल्या आहेत. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी बीएमसीची कारवाई योग्य नसल्याचे म्हटले आहे. मनपाने केलेल्या कारवाईमुळे माफी मागावी आणि मंदिर पुन्हा बांधून द्यावे, अशी मागणी समाजबांधव करत आहेत.

मंदिरावर झालेल्या कारवाईविरोधात गुरुवारी रात्री जैन समाजाने एका सभेचे आयोजन केले होते. यावेळी मंगलप्रभात लोढाही उपस्थित होते.



# SPOT NEWS

## अवैध धंद्याला विरोध करणाऱ्या उपसरपंचालाच केली मारहाण

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथील माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य गणेश राजाराम ढवळे यांनी गावातील तरुणाई व्यसनांच्या अधीन जात असल्याचे पाहून ग्रामपंचायत सभेत ठराव मांडला की गावातील अवैध धंदे बंद करा अशी मागणी केल्यावर गावातील दोन नंबर धंदेवाल्यांचे पित्त खवळले व चक्क माजी उपसरपंचास व विद्यमान सदस्य गणेश ढवळे यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली. याबाबत तालुक्यातील शिरूरला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर ढवळगाव आहे. नगर – पुणे मुख्य रस्ता जवळ असल्याने या गावातील अनेक व्यक्ती अवैध व्यवसायाकडे वळले आहेत. याचाच परिणाम म्हणून गावातील महाविद्यालयीन विद्यार्थी व अनेक ग्रामस्थ व्यसनाधीन होऊ लागले आहेत. हा सर्व प्रकार पाहून सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य यांनी ग्रामसभेत अवैध धंद्यावर बंदी घालण्याची मागणी करत ठराव मांडला. पण बेलवंडी पोलिसांच्या हप्तेखोरीमुळे दोन नंबर वाल्यांची मुजोरी वाढली आहे. त्याचाच परिणाम म्हणून निर्ढावलेल्या सूरज विजय पवार व सुदेश रामदास पवार यांनी गणेश ढवळे यांना धक्काबुक्की करत शिवीगाळ केली व धंदे कसे बंद करतो तेच आम्ही पाहतो असा सज्जड दम दिला. याबाबत पोलिस अधीक्षकांनी माहीती घेऊन बेलवंडी पोलिसांना तंबी देऊन अवैध धंद्यावर कारवाई करण्याची मागणी ढवळगाव ग्रामस्थांनी केली आहे.

## राज्यस्तरीय मंथन परीक्षेत शिवांशी वाणी राज्यात १३ वी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परीक्षेत ढोरजा येथील



जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी कु. शिवांशी सोन्याबापू वाणी हिने १५० पैकी १२६ गुण मिळवत राज्यात गुणवत्तेत १३ वा क्रमांक मिळवला. जिल्ह्यात आठवा तर कोळगाव केंद्रात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होत ढोरजा जिल्हा परिषद शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. यशस्वी विद्यार्थिनी कु. शिवांशी हिला वर्गशिक्षिका सौ. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. शिवांशीच्या कामगिरीबद्दल तिचे परिसरातून कौतुक होत आहे.

## राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश प्रभारीपदी माजी आ. लहू कानडे

**● नगर । वीरभूमी–**
राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्यकारणीची बैठक सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश अध्यक्ष प्रा.सुनील मगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली या बैठकीमध्ये माजी आमदार लहू कानडे उपस्थित होते तर त्यांची राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश प्रभारी पदी एकमताने निवड करण्यात आलीअसून या निवडीबद्दल अहिल्यानगर राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हा अध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी माजी आमदार लहू कानडे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी अंकुश मोहिते, पप्पू पाटील, सिद्धार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, सतीश साळवे आदीसह सामाजिक न्याय विभागाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हा अध्यक्ष सुरेश बनसोडे म्हणाले की, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे संघटन मजबूत करण्यासाठी माजी आमदार लहू कानडे यांना प्रदेश प्रभारीपदी निवड करण्यात आली तसेच सत्कार करण्यात आला.

# अवैध दारु विरोधात अकोल्यात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत बैठक

### तालुक्यात ४४ गावांत अवैध दारु विक्री । अवैध दारु बंद करण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यात ४४ गावात अवैध दारू विकली जाते.ती थांबवण्यासाठी आमदार किरण लहामटे यांच्या पुढाकाराने आज पोलिस, उत्पादन शुल्क अधिकारी व तालुक्यातील कार्यकर्ते यांची सभा आयोजित केली होती. खासदार भाऊसाहेब वाकचौरे या सभेला उपस्थित होते.



प्रास्ताविक करताना हेरंब कुलकर्णी यांनी तालुक्यातील ४४ गावात अवैध दारू मिळते हे पोलिस व उत्पादनशुल्क विभागाचे अपयश आहे. त्यांच्या हितसंबंधानेच ही विक्री होते आहे. या ४४ गावातील अवैध दारू एक महिन्यात पूर्ण बंद झाली पाहिजे

यानंतर कार्यकर्त्यांनी अनेक गावातील दारूचे भयानक वास्तव मांडले. कार्यकर्त्यांनी उत्पादनशुल्क पोलिस व दारूविक्रेते यांची साखळी यामुळे किती वर्षे लढायचे असे प्रश्न उपस्थित केले. दारूविक्रेते यांचे गुन्हेगारी वर्तन, कार्यकर्त्यांना दिला जाणारा त्रास, गावात येणारी बनावट दारू,दारूची चोरटी वाहतूक याचे अनेक धक्कादायक तपशील कार्यकर्त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार किरण लहामटे यांनी दारूमुळे गुन्हेगारी वाढते आहे. बीट पोलिसांचे दारूवाल्यांशी संबंध आढळले तर त्यांना निलंबित करा. गुटखा विकणाऱ्या टपऱ्याना नोटीस द्या. गुटखा आणि मटका बंद झाला पाहिजे व निवडणूक, वराती,वाढदिवस यातील दारू लोकांनीच बंद करण्याची गरज आहे. ही आढावा मीटिंग आता दर महिन्याला होऊन ४४ गावातील अवैध दारूविक्रीचा आढावा घेतला जाईल.

यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दारूमुळे गरीबांचे संसार उध्वस्त होतात त्यामुळे दारू थांबली पाहिजे. साखर कारखाने यांनी दारू बनवली त्याचा विपरीत परिणाम समाजावर झाला.आता ड्रग ही वाढले आहेत. या आंदोलनासोबत मी सतत राहील असे त्यांनी सांगितले.

यावेळी जालिंदर वाकचौरे यांनी तालुका दारुमुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची व त्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली.विनय सावंत यांनी उरुसात दारू बंद करावी अशी मागणी केली.

यावेळी कार्यकर्त्यांनी राजूर चे उरुसात दारू थांबावी, बिट अंमलदार बदल्या कराव्यात, बनावट दारू पकडावी,अनेक गुन्हे दाखल झालेल्यांवर तडीपार प्रस्ताव करावे, गुटखा बंदी करावी,मटका बंद व्हावा अशा अनेक सूचना केल्या.

पोलिस उपअधीक्षक कुणाल सोनवणे यांनी लवकरच तालुक्यातील या गावातील सरपंच व पोलिस पाटील यांची सभा आयोजित करण्यात येईल असे सांगून ४४ गावातील दारू बंद करण्याचा प्रशासन जास्तीत जास्त प्रयत्न करेल असे सांगितले. यावेळी शिवसेना नेते मच्छिंद्र धुमाळ,प्रा. मच्छिंद्र देशमुख, हेमंत आवारी, संदीप दराडे, निलेश तळेकर, संतोष मुर्तडक, श्रीनिवास रेणुकादास सुनील उगले, अमोल उगले, महेश नवले, गणेश वाकचौरे, सुभाष मालुंजकर, राजू जाधव, प्रमोद मंडलिक, भाऊसाहेब वाकचौरे, हरीभाऊ फापाळे यांनी आपले विचार व्यक्त केले.

यावेळी तालुक्यातील विविध सरपंच, राजकीय सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शंकर महाराजांच्या अध्यात्मातून समाज जागृतीचा उजेड : जाधव महाराज

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
सदगुरु शंकर महाराज यांच्या सेवेत येणाऱ्या प्रत्येकाला वेगळ्याच विचारांची उंची प्राप्त होत आहे. अध्यात्माकडे दुर्लक्ष करणारा तरुण वर्ग आज महाराजांच्या प्रेमात रमला आहे. सेवा, भक्ती आणि त्याग ही शिकवण तरुणांनी स्वीकारली असून त्यांच्या जीवनात नवा अध्याय सुरु झाला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय धर्मगुरु अशोक महाराज जाधव यांनी केले.



शिरसगाव बोडखा येथील सदगुरु शंकर महाराज उद्धवपीठात तीन दिवसीय चरित्र संगीत कथा सपंन्न झाली. या कार्यक्रमात अशोक महाराज जाधव यांनी शंकर महाराजांच्या जीवनकार्याचे विविध पैलू, त्यांचे चमत्कार, समाजात केलेले समतेचे कार्य आणि भक्तांवरील कृपाछाया यांचे चित्रण प्रभावीपणे उलगडून दाखविले. मार्गदर्शन करताना अशोक महाराज जाधव म्हणाले, अध्यात्माची परंपरा ही आपल्या राज्याचा आत्मा आहे. संत परंपरेतील शंकर महाराजांचे कार्य हे केवळ भक्तिभावापुरते मर्यादित नसून समाज प्रबोधनाचे आणि परिवर्तनाचे एक प्रभावी साधन ठरले आहे.

महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जातीभेदाच्या भिंती पाडत समतेचा संदेश दिला. त्यांच्या मठात येणाऱ्या प्रत्येक तरुणाला आजही हेच शिकवले जाते. धर्म म्हणजे अंधश्रद्धा नव्हे, तर विचारांची जागृती आहे. महाराजांनी भक्तांना केवळ चमत्कारांनी नव्हे, तर विचाराने जोडले. त्यांच्या शिकवणुकीमुळे अनेकांनी व्यसनमुक्त, सेवाभावी आणि चारित्र्यसंपन्न जीवनाची दिशा स्वीकारली आहे असेही जाधव यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात राज्याच्या विविध भागांतून आलेल्या शेकडो भक्तांनी सहभाग घेतला. सत्संग, भजने, कथा आणि ओव्यांच्या माध्यमातून शंकर महाराजांच्या कार्याचे सामर्थ्य भक्तांपुढे आले. महाराजांच्या मार्गदर्शनाने युवकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी अशा चरित्र कथांचे आयोजन सातत्याने होत राहील असेही जाधव यांनी स्पष्ट केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य कर्तुत्वाची व्याप्ती विश्वाला दिशा देणारी

### मधुकरराव सोनवणे । अकोले महाविद्यालयात महामानवाला अभिवादन

**● अकोले । वीरभूमी–**
केवळ दलित आणि मागासवर्गीय समाजापुरते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला मर्यादित – सीमित करु नये, त्यांनी कष्टकरी, कामगार, वंचित सर्व जाती धर्माला न्याय देण्याचे काम केले असून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची व्याप्ती विश्वाला दिशा देणारी आहे असे प्रतिपादन अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे स्वीकृत विश्वस्त आणि आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ अभ्यासक मधुकरराव सोनवणे यांनी केले.



अगस्ती महाविद्यालयात आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यान प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अकोले एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त, माजी आमदार वैभवराव पिचड होते.याप्रसंगी संस्थेचे कायम विश्वस्त कॉ. गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, प्रबंधक सीताराम बगाड यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. सोनवणे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भूषविलेल्या मंत्रीपदावरील कार्यकाल संस्मरणीय अन् दखलपात्र ठरला. तसेच कायदे विषयक क्षेत्रातील त्यांचे योगदान देशाला कायम स्वरूपी दिशादर्शक ठरले, हिंदू कोडबील, स्त्री वर्गाच्या हिताचे आणि संरक्षणा–संदर्भातील केलेले काम तसेच कामगार कायदे आणि समान दर्जा भारतातील लोकशाही पद्धती अन् मतदान हक्क प्रक्रिया याबाबतीत डॉ. बाबासाहेबांचे धोरणात्मक कार्य दिशादर्शक ठरले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार णवैभवराव पिचड यांनी डॉ. बाबासाहेबांची राजकीय , सामाजिक, आर्थिक व विशेष करून न्याय प्रक्रिया तसेच एकूणच राष्ट्रीय जडणघडणीतील वैचारिक अन् कृतीशील योगदान हे भारतीयांसाठी कधीही न विसरणारे आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी कायम विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. नितीन आरोटे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.अशोक दातीर यांनी मानले.

यावेळी प्रा.विजय शेंडगे आणि सुदेश काठाळे यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्ताने त्यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा.शेंडगे व काठाळे यांनी आपल्या सेवा कालावधीतील आठवणींना उजाळा दिला व संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

# श्रवंती हर्बल प्रॉडक्टच्या रुपाने मनी बॅक गॅरंटी देणारे पहिले उत्पादन

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
पुण्यातील बीएमसीसी महाविद्यालयात शिकणाऱ्या शिरसगाव बोडखा येथील कु. श्रवंती शंकर गवते या तरुणीने नोकरीची अपेक्षा सोडून सेंद्रिय शेती सुरू केली. वडिलांच्यापरंपरागत २५ एकर पैकी १० एकर शेतीमध्ये शेवगा, स्पिरुलिना, अश्वगंधा, शतावरी, जांभुळ, गुडमार, टेटू, अर्जुन, हिरडा, बेहडा, आवळा, सफेद मुसळी, तुळस, निम, हळद (काळी व पिवळी), पुदिना, हादगा, कडीपत्ता, नोनी इत्यादी २६ प्रकारच्या वन औषधींची लागवड करत त्यांची सेंद्रिय पद्धतीने त्याची वाढ केली आहे. रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा, औषधांचा अतिवापर केल्याने शेती नापीक होऊन मानवजातीला विविध आजार होत आहेत. याचा गांभीर्याने विचार करून कु. श्रवंतीने सेंद्रिय शेती करत सर्वोत्तम हर्बल सुपरफूडचे उत्पादन घेत आहे.

**उच्चशिक्षित तरुणीची यशोगाथा**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील शिरसगाव बोडखा गावातील कु. श्रवंती गवते या तरुणीने शेतीची आवड असल्यामुळे नोकरीच्या मागे न लागता शेतीकडे वळण्याचा निर्णय घेतला. तिचे कुटुंब पारंपरिक ऊस, गहू आणि हरभऱ्याची रासायनिक शेती होती करत होते. ज्यातून त्यांना जेमतेम नफा मिळायचा. आजूबाजूला, परिचित व्यक्तींना काहीनाकाही आजरांनी ग्रासलेले पाहून श्रवंतीने विषविरहित सेंद्रिय शेती करण्याचा निर्धार केला.

रासायनिक शेती मानवाच्या हिताची नाही हे जाणून श्रवंतीने सेंद्रिय शेतीचा



अभ्यास केला. जमिनीमध्ये जवळपास अडीच हजार विषारी घटक असतात त्यामुळे मानवाला आजार होतात. ते विषारी घटक जमिनीत राहू नये म्हणून सलग ६ वर्षे असलेली पडीक जमीन निवडली. विविध आजारांवर समाधान म्हणून मुख्यत्वे मोरिंगा (शेवगा) या पोषणमूल्यांनी भरलेल्या पिकाची निवड केली. त्याचे बियाणे बिजमाता पद्मश्री पुरस्कार सन्मानित राहीबाई पोपेरे यांच्याकडून गावरान बियाणे घेतले व त्याला इतर वनौषधींची जोड दिली. श्रीगोंद्याच्या उष्ण हवामानातही ही पीके चांगली वाढतात. तीने एकूण १० एकरात वनौषधींची शेती सुरू केली आहे. औषधी वनस्पतीचे पानं सुकवून त्यापासून पावडर तयार केली. त्यातून. नैसर्गिक प्रकिया करून टॅब्लेट्स, हर्बल चहा, हर्बल चटणी, हर्बल एनर्जी ड्रिंक, हर्बल फेस पॅक, हर्बल रिलीफ ऑइल इ प्रॉडक्ट्स सुरु केले, त्या सर्व प्रॉडक्ट्स ला एफ.डी.आय. ची मान्यता व APEDA (NABL) चे प्रमाणपत्र आहे.

विविध असाध्य आजार त्यामध्ये डायबेटीस, हृदयाचे विकार, बी पी, थायरॉईड, अपचन, पित्त, महिलांच्या विविध समस्या, केसगळती इ. ३०० आजारांवर हे उत्पादने गूण देतात. जर नियमित ९० दिवस हे प्रॉडक्ट्स घेतले व गूण आला नाही तर संपूर्ण घेतलेले पैसे परत देण्याची गॅरंटी सुद्धा ही श्रवंती देतीय. आतापर्यंत हजारो रुग्णांना ह्या प्रॉडक्ट्सचा फायदा झालेला आहे, ज्यावेळेस रुग्ण येतात व जीर्ण आजारातून बरे झाल्याने त्यांच्या डोळ्यातून अश्रू अनावर होतात तेव्हा जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते असे मनोगत श्रवंती व्यक्त करते. श्रवंती हिने मातीची सुपीकता वाढवण्यासाठी हरित खत आणि गांडूळ खताचा वापर केला. तसेच जीवामृत, अंडे व दह्याचे संजीवक त्यांच्या शेतीत तीने वापरले. सेंद्रिय शेतीच्या तंत्रांचा वापर करून मातीची गुणवत्ता सुधारली.

**श्रवंती हीची यशोगाथा**

आधुनिक शिक्षण आणि पारंपरिक शेती यांचा संगम आहे. तिच्या सेंद्रिय शेतीतून केवळ आर्थिक यशच नाही तर पर्यावरणपूरक शेतीचा आदर्शही निर्माण केला आहे. तिला या कामी तिचे वडील छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथे कार्यरत असणारे प्रा शंकर गवते यांची मोलाची मदत होत आहे.

> आज जगाच्या पाठीवर औषधाच्या बाबत मेडिकल सायन्सची कुठलीच शाखा मनी बॅक गॅरंटी देत नाही पण आम्ही १०० % देतो कारण गावरान बियांची निवड, आमची असलेली विषमुक्त शेती, जीवामृताचा वापर, संजीवकांचा वापर, व जगातील सर्वोत्तम सुपरफूडची लागवड व नैसर्गिक पद्धतीने त्याची केलेली देखभाल ह्यामुळे हे शक्य झाले, अद्यापपर्यंत एकही रुग्ण मला पैसे परत पाहिजेत यासाठी आला नाही यातच आमच्या प्रॉडक्ट्सचे यश आहे.
>
> **– कु. श्रवंती शंकर गवते,** संचालिका, श्रवंती हर्बल प्रोडक्टस.

## SPOT NEWS

### श्री हरिहरेश्वर मूर्ती प्राणप्रतिष्ठेनिमित्त शिंगवे येथे भव्य कीर्तन महोत्सव

**● कोपरगाव । वीरभूमी–**



तालुक्यातील श्रीक्षेत्र शिंगवे येथे श्री हरीहरेश्वर मूर्ती प्राण प्रतिष्ठा व कलश रोहन सोहळ्याच्या निमित्ताने भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आचार्य भगवान महाराज शास्त्री यांनी दिली आहे. सदरचा कार्यक्रम दिनांक २४/४/२०२५ पासून ते १/५/२०२५ पर्यंत होणार आहे. या काळात दररोज सायंकाळी ७ ते ९ वा. हभप. शिवाजी महाराज भालूरकर, हभप. नवनाथ महाराज म्हस्के, हभप. महादेव महाराज बोराडे, हभप. बाळासाहेब महाराज रंजाळे, हभप. ज्ञानेश्वर महाराज गुंजाळ, स्वामी प्रकाशानंद गिरी महाराज, देवगड आश्रम, हभप. भगवान महाराज जंगले शास्त्री आदींची कीर्तन सेवा होणार आहे तसेच दि.१/५/२०२५ रोजी सायंकाळी पाच वाजता हिंदू धर्म रक्षक महंत रामगिरीजी महाराज, सरला बेट यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तरी परिसरातील भाविकांनी ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन हरिहर गोविंद आश्रम श्रीक्षेत्र शिंगवे, राहाता –कोपरगाव यांच्या वतीने आचार्य भगवान शास्त्री महाराज व स्वामी साई सुरेशानंद भारती यांचे सह समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

### तरटीफाटा जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**● नगर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ (ता. पारनेर) येथील तरटीफाटा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या कार्यक्रमात विविध शिष्यवृत्ती परीक्षा, कला–क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजय खोडदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ व माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, मारुती रोकडे, मच्छिंद्र रोकडे, मुक्ताजी साळुंके, भास्कर साळुंके, माजी मुख्याध्यापक कृष्णराव झावरे सर, माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रावसाहेब जाधव, किरण साळुंके, गुलाब रोकडे, मनिषा रोकडे आदींसह ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. कार्यक्रमात मंथन शिष्यवृत्ती परीक्षा, लिप फॉर वर्ल्ड इंग्लिश प्रोग्राम, मिशन आरंभ शिष्यवृत्ती पूर्वपरीक्षा आणि तालुकास्तरीय कला–क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पारनेर तालुकास्तरावर चित्रकला स्पर्धेत बालगटात प्रथम क्रमांक मिळवलेल्या कु. अन्वयी रोकडे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक विशाल पाचारणे सर आणि मुख्याध्यापक विश्वासराव नेव्हे सर यांचाही ग्रामस्थांनी विशेष गौरव केला. बाबासाहेब शिंदे म्हणाले की, हीच शाळा माझा मुलगा एमबीबीएस डॉक्टर होण्यासाठी आधारभूत ठरली. या शाळेला उज्वल यशाची परंपरा लाभली आहे. येथे शिक्षक तळमळीने काम करत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. त्यामुळे ही शाळा आज गावाचा खरा अभिमान आहे.

# शिव-पाणंद रस्ते आंदोलन महसुलमंत्र्यांच्या आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित

## शरद पवळे । मा. महसुल मंत्री यांच्या कार्यालयात दि.२४ एप्रिलला होणार बैठक

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य शिव–पाणंद, शेतरस्ता चळवळीच्या वतीने शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर आझाद मैदानावर दि.२१ व २२ एप्रिल रोजी होणाऱ्या राज्यभरातील शेतकऱ्यांनी धरणे व जलत्याग आंदोलनाची महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यालयाने दखल घेतली असून योग्य कार्यवाहीसाठी कार्यालयामध्ये शिव– पाणंद व शेतरस्त्यांच्या प्रश्नावरील मागण्याच्या संदर्भात प्रमुख पदाधिकाऱ्यांची दि.२४ एप्रिलला बैठक आयोजित करण्यात आली आहे. या सकारात्मक प्रतिसादामुळे चळवळीच्या नेत्यांनी महसुलचा स्वतंत्र शासन निर्णय बनवण्यासंदर्भात वेळ देत आझाद मैदनावरील राज्यव्यापी आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

यावेळी शरद पवळे व दादासाहेब जंगले यांनी सांगितले की सरकारशी चर्चा करून आपल्या मागण्या शासननिर्णयात घेण्यासाठी आम्ही आग्रही राहू शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता मिळून देण्यासाठी आग्रही राहून शिव– पाणंद, शेतरस्ते, गाडीमार्ग, पायमार्ग, वहिवाटीचे रस्ते आदी नकाशावरील



शेतरस्त्यांसह तहसिल प्रांत कार्यालयातील प्रलंबित शेतरस्ता केसेस यासंदर्भात विशेष कालावधी मुदत जाहीर करून शेतरस्त्यांच्या हद्द निश्चिती, नकाशावर लांबी, रुंदी, दगड नंबरी, शेतरस्ता नंबरींग, ग्राम शेतरस्ता समिती स्थापना यासह मोजणी शुल्क संरक्षण फी संदर्भात विशेष निर्णय आदी मागण्या शासनिर्णयात घेण्यात चळवळ आग्रही राहील. तरी राज्यभरातीत तमाम शेतकरी बांधव, वृत्तपत्र, इले. मिडीयातील पत्रकार बांधवांनी दिलेल्या पाठबळामुळे आज सरकारने सकारात्मक भुमिका घेतली असुन महसुलचे मुख्य सचिव प्रविण महाजन, विशेष कार्य अधिकारी सचिन ढोले, राहूल गांगुर्डे यांनी शेतकऱ्यांची भावना व पिढ्यान पिढ्या चाललेला संघर्ष पाहून शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला प्रतिसाद देवून दुरध्तनीवरून संपर्क साधत मा. महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी न्यायाची भुमिका घेत तातडीने पत्र देत मुंबई येथिल महसुल कार्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या उपस्थित अधिकाऱ्यांची बैठीक घेवून परिपूर्ण शासन निर्णय बनवून शेतकऱ्यांना सरकार दर्जेदार शेतरस्ते देण्यासाठी बांधील राहील असे आश्वासन दिले.

शेतीच्या सीमांवर असणारे अडथळे, बंद रस्ते, न्यायालयात अडकलेली प्रकरणे आणि सरकारी दुर्लक्ष. या पार्श्वभूमीवर आंदोलनाची गरज होती. मात्र गोरगरीब शेतकऱ्यांनी उन्हाच्या तडाख्यात उपोषणाला बसू नये, या महसूल मंत्री बावनकुळे साहेबांच्या संवेदनशील विचाराने चळवळीचे प्रणेते शरदराव पवळे आणि समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी कानिफनाथ मंदिर जंगलेवाडी श्रीगोंदा येथे तातडीने बैठक घेऊन आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी शिरूर व श्रीगोंदा चळवळ कृती समिती सदस्य सुरेश वाळके व बापुराव जंगले पाटील उपस्थित होते.

# हिंदीची सक्ती तातडीने मागे घ्या : माकप

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्रात पहिलीपासून पाचवीपर्यंत मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी सक्तीची करण्याचा निर्णय, मराठी भाषा, महाराष्ट्राचा स्वाभिमान व मराठी संस्कृतीवर हल्ला आहे.

हिंदी बद्दल व इतर सर्वच भाषांबद्दल आम्हाला आदरच आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये मराठी सोडून इतर कोणत्याही भाषेची सक्ती करणं अयोग्य असून हिंदी बाबत करण्यात आलेली सक्ती सरकारने तातडीने मागे घ्यावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे.

एकीकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा व दुसरीकडे महाराष्ट्रात हिंदी भाषा पहिलीपासून विद्यार्थ्यांना अनिवार्य करायची हे केवळ संतापजनक नसून निषेधार्हही आहे.

भाजप याद्वारे आपला द्वेषमूलक, मतदान केंद्री व विभाजनवादी अजेंडा पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहे. मराठी भाषा व मराठी संस्कृती कमजोर केल्याशिवाय देशाच्या काही भागात ज्या प्रकारचे राजकारण आहे त्या प्रकारचे असहिष्णू, द्वेषमूलक राजकारण या महाराष्ट्राच्या मातीत रुजणार नाही याची जाणीव असल्यामुळेच भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून हिंदी भाषेच्या सक्तीची खेळी खेळली गेली आहे.

हिंदी भाषेबद्दल नसणारी द्वेष भावना यामुळे महाराष्ट्रात निर्माण होऊन ती महाराष्ट्रात रुजण्याचा धोकाही या पार्श्वभूमीवर निर्माण झाला आहे.

भारत हा विविध भाषा, संस्कृती व परंपरांनी नटलेला देश आहे. भाषा, संस्कृती व परंपरांमधील हे वैविध्य आपल्या देशाला समृद्ध करत आले आहे. मात्र भाजप व संघ परिवाराला, हे 'विविधतेत एकता' हे तत्व मान्य नसल्याने त्यांना देशातील विविध भाषा, संस्कृती व परंपरांना सुरुंग लावून त्यात एकारलेपणा आणावयाचा आहे. एक देश एक भाषा हे धोरण त्यांनी यासाठी घेतले आहे. मराठीचा या धोरणासाठी बळी देण्याचे पाऊल हिंदी सक्तीचे करून त्यांनी टाकले आहे.

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपने या निर्णयाचा मुहूर्त निश्चित केलेला दिसतो आहे. मुंबई मधील मराठी भाषिकांना जाती धर्मांमध्ये आपसात झुंजवत ठेवायचे व दुसऱ्या बाजूला उत्तर भारतीय मते हिंदी भाषेच्या आधारे आपल्याकडे वळवायची हा भारतीय जनता पक्षाचा यामागे डाव आहे.

आपल्या स्वार्थी राजकारणासाठी मराठी भाषा व मराठी संस्कृतीचा बळी देण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे पहिलीपासून तीन तीन भाषा विषय शिकण्याची वेळ कोवळ्या मुलांवर येणार असून यामुळे अभ्यासाचा अतिरिक्त बोजा कोवळ्या विद्यार्थ्यांवर लादला जाणार आहे. शिक्षणशास्त्र व बाल मानसशास्त्राच्याही दृष्टीने असे होणे अत्यंत अशास्त्रीय आहे. राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचा आपला निर्णय या पार्श्वभूमीवर तातडीने मागे घ्यावा अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. सरकारने जनतेची भावना व न्याय लक्षात घेऊन सक्ती मागे न घेतल्यास या विरोधात राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पक्षाच्या वतीने डॉ. अजित नवले यांनी दिला आहे.

### गुरुदेव प्रशालेत जादुगार प्रकाश शिरोळे यांच्या जादूच्या प्रयोगाने विद्यार्थी मंत्रमुग्ध



**● नगर । वीरभूमी–**

नाविन्याचा ध्यास आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून गुरुदेव शिक्षण संस्था काम करत असते. याच संकल्पनेतून आज गुरुदेव सेमी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सुपा येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार व राज्यस्तरीय पुरस्कार विजेते प्रकाश शिरोळे यांच्या जादूच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना हात चलाखी व वैज्ञानिक दृष्टिकोन यावर आधारित अनेक छान छान प्रयोग करून दाखवले. हे प्रयोग पाहून विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि मुलांनी या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेतला. सकाळपासूनच प्रशालेचे विद्यार्थी मॅजिक शो ची आतुरतेने वाट पाहत होते. या मॅजिक शो मुळे प्रशालेचे वातावरण आनंददायी बनले होते.

यावेळी रांगडा, खर्डा या चित्रपटाचे गीतकार अरुण वाळुंज हे उपस्थित होते. त्यांनी कविता सादर करत विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. यावेळी संस्थापक सुभाष मगर, प्रशालेचे प्राचार्य तुषार कदम, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य संतोष खराबी, पर्यवेक्षक मंगेश चितळकर, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या सभासद नोंदणीचा टाकळी ढोकेश्वर येथे शुभारंभ

**● पारनेर । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभासद नोंदणी अभियानाला पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातून उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी आमदार काशिनाथ दाते आणि जिल्हा अध्यक्ष अशोक सावंत यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बांधणी आणि विस्ताराला गती दिली आहे. या अभियानाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना पक्षाशी जोडण्याचा आणि पक्ष संघटनेची ताकद वाढवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.



टाकळी ढोकेश्वर गटातील भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, ढोकी आणि टाकळी ढोकेश्वर या गावांमध्ये सभासद नोंदणी अभियानाचा शुभारंभ आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवक तालुका अध्यक्ष भास्कर उचाळे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सभासद नोंदणीच्या महत्त्वावर प्रकाश टाकत, यामुळे पक्षाच्या स्थानिक पातळीवरील बांधणीला बळ मिळेल, असे मत व्यक्त केले.या अभियानाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना पक्षाच्या विचारधारेशी आणि कार्याशी जोडण्यावर भर देण्यात येत आहे. सभासद नोंदणीमुळे पक्षाची ग्रामीण भागातील ताकद वाढणार असून, कार्यकर्त्यांना नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याची संधी मिळणार आहे. पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यापूर्वीही जनतेच्या प्रश्नांसाठी सक्रिय भूमिका घेतली आहे. याच धर्तीवर, या अभियानातून पक्षाला नवसंजननी मिळेल, असा विश्वास तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी व्यक्त केला. त्यांनी कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त सभासद जोडण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात उपस्थित कार्यकर्त्यांनी गावागावांत सभासद नोंदणीला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी ग्रामस्थांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत पक्षाच्या या उपक्रमाचे स्वागत केले. सभासद नोंदणी अभियानामुळे पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होईल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

येत्या काळात तालुक्यातील इतर गटांमध्येही हे अभियान राबवले जाणार आहे. यापूर्वी पारनेर तालुक्यात आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली आयोजित जनता दरबारातही नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न झाला होता. त्या धर्तीवर, सभासद नोंदणी अभियान हे पक्षाला जनमानसात अधिक जवळ आणण्याचा आणि सामान्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

# शालेय जीवनातील स्पर्धा ही यशाची खरी पायाभरणी : अभय आव्हाड

## श्री विवेकानंद शाळेचे सर्वाधिक विद्यार्थी तालुका गुणवत्ता यादीत

शालेय जीवनातील स्पर्धा ही राज्यसेवा व लोकसेवा स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी आहे. या शालाबाह्य स्पर्धा परीक्षा यशाकडे जाण्याची खरी पायाभरणी आहे असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

शहरातील श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेत ४५ विद्यार्थ्यांनी राज्य, जिल्हा व तालुका गुणवत्ता यादीत आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रसंगी अध्यक्षस्थानावरून आव्हाड बोलत होते.




यावेळी आव्हाड म्हणाले की, शालेय स्तरावर विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केल्यामुळे विद्यार्थ्यांची यूपीएससी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण होऊन चांगल्या प्रकारे यश संपादन करत आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये मार्गदर्शक शिक्षक व पालकांचे महत्त्वाचे स्थान आहे. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्टीमध्ये मोबाईल पासून अलिप्त राहून विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाचन करावे तसेच मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन यावेळी आव्हाड यांनी केले.

शाळेतील इयत्ता चौथीतील हर्षनिता दिलीप ठोंबरे व इयत्ता दुसरी मधील आतार माहिरा रईस या विद्यार्थिनींची राज्यगुणवत्ता यादीत तर १८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत तर २५ विद्यार्थी तालुका गुणवत्ता यादीत आले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना फेटे बांधून व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्येने पालक उपस्थित होते

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके यांनी केले तर आभार अनुजा कुलकर्णी यांनी मानले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षिका अनुजा कुलकर्णी, जयश्री एकशिंगे, मनिषा गायके, आशा बांदल, राधिका सरोदे, ज्योती हंपे, किर्ती दगडखैर, विद्या महाजन यांचेसह इतरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पुरस्कार विजेत्या खेळाडूंमुळे जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । नगर जिल्हाधिकारी कार्यालयात शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू आणि प्रशिक्षकांचा सन्मान

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
विविध क्रीडा प्रकारात आपले नैपुण्य दाखून शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित झालेल्या खेळाडूमुळे क्रीडा क्षेत्रात जिल्ह्याचा नावलौकीक अधिकच उंचावला असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू आणि प्रशिक्षकांचा सन्मान पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार काशिनाथ दाते, अमोल खताळ, विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उप वनसंरक्षक अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, आदी उपस्थित होते.

क्रीडा मार्गदर्शकाचा जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या धनुर्विद्या प्रशिक्षक शुभांगी रुपडे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या वेटलिफ्टिंग खेळाडू कोमल वाकडे, कबड्डी खेळाडू शंकर गदाई यांचा पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कबड्डी खेळाडू अस्लम इनामदार याच्या भावाने सन्मान स्वीकारला.

चारही खेळाडूंनी अतिशय कष्टाने साध्य केलेले यश खूप महत्वपूर्ण आहे. एकाचवेळी जिल्ह्यातील चार खेळाडूचा शिवछत्रपती पुरस्काराने सन्मान व्हावा ही बाब अतिशय भूषणावह असून या यशाने जिल्ह्याच्या क्रिडा क्षेत्राला नवी प्रेरणा मिळेल आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंनी मिळविलेले हे यश इतरांनाही प्रेरक असल्याचे नमूद करून मंत्री विखे पाटील म्हणाले, सर्व खेळांना प्रोत्साहन देण्याचे काम शासन स्तरावरून होत आहे. जिल्ह्यातील साहसी क्रीडा प्रकारांना पाठबळ देण्यसाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याची माहीती मंत्री विखे पाटील यांनी दिली.



जिल्ह्यातील क्रीडाक्षेत्राला सर्वतोपरी मदत शासन स्तरावरून करण्यात येत असून यापुर्वी राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेसाठी मॅटची उपलब्धता करून देण्यात आली होती. शहरातील क्रीडा संकुलाला निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली असल्याने सर्व सुविधांनी परीपूर्ण असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल तयार होईल आशी ग्वाही त्यांनी दिली.

# प्रभू येशू ख्रिस्त यांनी संपूर्ण जगाला दया, क्षमा, शांतीसह मानवतेची शिकवण दिली

## प्रा. बाबा खरात । संगमनेर खुर्द मेथोडिस्ट चर्चमध्ये गुड फ्राय डे कार्यक्रम

**● संगमनेर । वीरभूमी–**
प्रभू येशू ख्रिस्त यांच्या मुखातून वध स्तंबावर छळल्यानंतर मानवतेच्या हितासाठी व कल्याणासाठी जे सात उद्गार निघाले त्यातून देवाच्या इच्छेचा आणि येशू ख्रिस्तांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतला जाऊ शकतो. येशू ख्रिस्त यांनी संपूर्ण जगालाच दया, क्षमा शांती यांसह मानवतेची शिकवण दिली असल्याचे प्रतिपादन मेथोडिस्ट चर्चचे सचिव प्रा. बाबा खरात यांनी व्यक्त केले आहे.

गुड फ्रायडे निमित्त संगमनेर येथील मेथोडिस्ट चर्च येथे ख्रिस्ती बांधवांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. यावेळी समवेत चर्चे धर्मगुरू रेव्ह सतीश मिरजकर, भाऊसाहेब नेटके, एड. अरविंद राठोड, विजय खंडिझोड, राजेंद्र सांगळे, प्रभाकर चांदेकर, राजेंद्र गायकवाड, प्रवीण रोहम ,विलास जाधव, सौ सुनीता खंडीझोड, मनीषा कसाब, डॉ. सौ हेमलता राठोड, सौ हन्ना जाधव, सौ प्रतिभा रोहम, सौ रश्मी सांगळे, सौ संजीवनी गायकवाड, सौ चांदेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बाबा खरात म्हणाले की, वधस्तंभावर येशू ख्रिस्तांच्या मुखातून निघालेले सप्तोद्गार हे ख्रिस्तांच्या अंतरंगाचा ठाव घेणारे व स्वतःच्या कार्याचे मूल्यमापन करणारे असे आहे. त्यात ते म्हणतात की, हे प्रभू यांना क्षमा कर कारण हे काय करतात यांना माहीत नाही, हे प्रभू मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपून देतो खरे तर येशू ख्रिस्त यांचे जीवन संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण देणारे आहे. गुड फ्रायडे निमित्त येशू ख्रिस्त यांच्या विचारांचा आपण जागर करत असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी रेव्ह सतीश मिरजकर म्हणाले की, ख्रिस्ती समाजात गुड फ्रायडे निमित्त प्रभू येशू ख्रिस्त यांच्या सात उदगारांवर चिंतन केले जाते. प्रभू येशू ख्रिस्त हे बलिदान, प्रेम, करुणा ,शांती, दया क्षमा याचे प्रतीक असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सत्यानंद कसाब यांनी केले. तर आभार प्रा. बाबा खरात यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खजिनदार प्रतीक खरात, जितेंद्र सांगळे ,अभिजीत चांदेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

गुड फ्रायडे आणि ईस्टर संडे निमित्त माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, कॅन्सर तज्ञ डॉक्टर जयश्रीताई थोरात, कारखान्याची संचालक इंद्रजीत भाऊ थोरात, माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांनीही ख्रिस्ती बांधवांना शुभेच्छा दिल्या आहे.

# कोपरगाव शहरात घड्याळ दालनात चोरी

## मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी घेतला घटनास्थळी आढावा

**● कोपरगाव । वीरभूमी–**
कोपरगाव शहराच्या मध्यवर्ती भागात गुरुद्वारा रोडवरील प्रसिद्ध सचिन वॉच या घड्याळाच्या दालनात आज पहाटे चोरीची गंभीर घटना घडली. याची माहिती मिळताच मा.आ. सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला.भयभीत नागरिकांना आधार देत उपस्थित व्यापारी वर्गाशी चर्चा केली.



सचिन वॉच या दालनाचे मालक संजय लोहाडे आणि सनी लोहाडे यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. घडल्या प्रकाराने नाराजी व्यक्त केली व त्यांनी यावेळी म्हटले की, शहराच्या मध्यवर्ती भागात असे प्रकार घडणे अत्यंत गंभीर असून, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी तातडीने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून तपास जलदगतीने सुरु करण्याच्या दृष्टीने चर्चा केली. या घटनेबद्दल एस.पी राकेश ओला यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी तपासासाठी पथक पाठवत असल्याची माहिती दिली. प्रतिक्रिया देताना सौ. कोल्हे यांनी सांगितले की, पोलिसांनी गस्त वाढवावी आणि गुन्हेगारांवर स्थानिक पातळीवर पोलिसांचा धाक राहील, यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. आरोपींना त्वरित अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात अशा घटना घडू नयेत अशी भूमिका कोपरगाव शहर पोलिस निरीक्षक भगवान मथुरे यांच्याशी बोलताना व्यक्त केली.

शहराच्या मध्यवर्ती भागात असा प्रकार घडल्यामुळे या घटनेमुळे व्यापारी वर्गात संताप आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अशा घटना रोखण्यासाठी कोपरगाव शहरात पोलिसांनी चोख गस्त ठेवावी आणि संवेदनशील भागांमध्ये विशेष नजर ठेवावी, अशी मागणीही त्यांनी केली.

या वेळी शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी घटनास्थळी उपस्थित होते. यामध्ये अतुलशेठ काले, महावीर काले, राजाभाऊ झावरे, दिलीपशेठ अजमेरे, अनिल कासलीवाल, नारायणशेठ अग्रवाल, कलविंदर दडियाल, अशोकशेठ लोहाडे, संतोष गंगवाल, चेतन राणे, अमित लोहाडे यासह अनेक व्यापारी बांधव उपस्थित होते.

संपूर्ण व्यापारी वर्गाने एकत्र येऊन प्रशासनाकडे ठोस कृतीची मागणी केली असून, कोपरगाव शहर गुन्हेगारीपासून सुरक्षित राहण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. गुन्हेगारांवर जरब ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर भूमिका घेण्याची गरज आहे अशी सौ.स्नेहलताताई कोल्हे यांच्याकडेही त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

# थोरात कारखान्यास वीज निर्मितीमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कार

## सातत्यपूर्ण कामगिरी बद्दल राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

**● संगमनेर । वीरभूमी–**
महाराष्ट्राचे माजी कृषी व महसूल मंत्री तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशातील सहकारासाठी आदर्श ठरलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याला सलग दुसऱ्या वर्षी वीज निर्मिती बद्दल सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दलचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

पुणे, बाणेर येथे नॅशनल को जनरेशन फेडरेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार ज्येष्ठ राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांनी स्वीकारला. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, जयप्रकाश दांडेगावकर, राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी एन पाटील, प्रतापराव पवार, राजेंद्र नागवडे, विवेक कोल्हे, तर थोरात कारखान्याच्या वतीने कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, चीफ इंजिनियर नवनाथ गडाख, चीफ केमिस्ट संजय पाटील, अशोक मुटकुळे, भारत देशमुख, भाऊसाहेब खर्डे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने उभारलेला नवीन ५५०० मे टन क्षमता व ३० मेगा वॅट वीज निर्मितीचा प्रकल्प हा दिशादर्शक ठरला आहे. प्रतिकूल परिस्थिती ही कारखान्याने शेतकरी सभासद व ऊस उत्पादक यांचे हित जपताना कायम उच्चांची भाव दिला आहे. याचबरोबर मागील हंगामात ८ लाख २५ हजार ९९४ मे टनाचे गाळप केले आहे. तर मागील वर्षी ७ कोटी ८९ लाख युनिटची वीज निर्मिती केली आहे. यातून ५ कोटी २८ लाख ९३ हजार युनिट ही वीज निर्यात केली आहे. यातून कारखान्याला ३८ कोटी ७१ लाख रुपये नफा झाला आहे. कारखान्याने केलेल्या या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पातळीवरील कन्सिस्टंट परफॉर्मन्स (सातत्यपूर्ण कामगिरी) बदलता राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. मागील वर्षीही थोरात कारखान्याला या पुरस्काराने दिल्ली येथे गौरविण्यात आले होते.

यावेळी बोलताना खासदार पवार म्हणाले की, सहकार क्षेत्राने महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबुती दिली आहे. सहकार टिकला पाहिजे तो वाढला पाहिजे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकारामध्ये आदर्श तत्व रुजवली आणि याच तत्वावर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरचा सहकार हा राज्यासाठी दिशादर्शक ठरणारा आहे. आगामी काळात साखर उद्योगात अनेक आव्हाने असून ए आय तंत्रज्ञानाचा वापर करून हेक्टरी उत्पादन वाढवण्यासाठी साखर कारखान्यांच्या कृषी विभागाने काम करावे असे आवाहन त्यांनी केले.




याप्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, पी. एन. पाटील जयप्रकाश दांडेगावकर यांसह विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. तर कारखान्याचे चेअरमन बाबा ओहोळ म्हणाले की, थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम तालुक्याचे हृदय म्हणून काम केले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली गुणवत्तापूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध पुरस्कार या कारखान्याला मिळाले आहे. हे पुरस्कार सांघिक कामाचे यश असल्याचे ते म्हणाले.

कारखान्याला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कारखान्याचे मार्गदर्शक लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ.डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे, ॲड. माधवराव कानवडे, रणजीत सिंह देशमुख, सुधाकर जोशी शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, राजेंद्र गुंजाळ, बाजीराव पा. खेमनर, इंद्रजीतभाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, कारखान्याचे व्हाईस चेअरमन संतोष हासे यांसह सर्व संचालक व विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com